International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.2 Nov – Dec 2022

# विवाहपूर्वी जोडीदार निवडीवर परिणाम करणारे घटक

**प्रा. मिनाक्षी पांडुरंगसा बोरीवाले[1] डॉ. संध्या आयस्कर[2]**
[1]संशोधक विद्यार्थी, श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय, वसमत
[2]संशोधन मार्गदर्शक, गृहविज्ञान विभाग, महिला कला महाविद्यालय, बीड
*Corresponding Author-* प्रा. मिनाक्षी पांडुरंगसा बोरीवाले
Email: mpboriwale123@gamil.com
DOI- 10.5281/zenodo.7498944

**सारांश (Abstract):**

जोडीदार निवडत असताना प्रत्येकाने जोडीदाराच्या अपेक्षा ठरवूनच जोडीदाराची निवड केली तर जोडीदार निवडीची प्रक्रिया त्यांना अवघड वाटणार नाही व जोडीदारात काय हवे आहे आणि काय नकोय हे ठरवणे सोपे होईल. जोडीदार निवडत असताना धर्म, जात, भाषा, जन्मपत्रिका अशा अनेक निकषांना प्राधान्य दिले जाते. तर कधी-कधी यापैकी काही निकषामुळे जोडीदार निवडीवर मर्यादा येतात. वैवाहिक बंधन स्वीकारणाऱ्या व्यक्तींच्या मूल्यांमध्ये साम्यता असेत तर ते दोघे एकमेकांना अनुरूप असू शकतात. बरेच तरूण-तरूणी जोडीदार निवडत असताना त्याची वजन, रंग, रूप, वय, शिक्षण यांना अधिक महत्त्व देतात. पण त्यांच्या आयुष्यात येणाऱ्या जोडीदाराचे विचार पूरक आहेत का हे कोणीही पाहत नाही. तेव्हा सदरील अभ्यासात जोडीदार निवडीच्या निकषावर चर्चा केली गेली आहे.

**बीजसंज्ञा (Key Words):** विवाह, जोडीदार निवडीचे घटक, यशस्वी विवाह इत्यादी

**प्रस्तावना (Introduction):**

प्रत्येक समाजात कुटुंब आणि विवाह या दोन सामाजिक संस्थांना अतिशय महत्त्व आहे. कारण कुटुंब व विवाह संस्थेतून भावनात्मक गोष्टींचा अंतर्भाव होतो. कुटुंब व विवाह संस्था या स्नेह, प्रेम, आपुलकी या भावनात्मक आधारावरच अवलंबून आहे. कुटुंब आणि विवाह संस्थेवर काही संकट आले तर त्याचा परिणाम व्यक्तीच्या कौटुंबिक संबंधावर होतो. म्हणून कुटुंब व विवाह या दोन्ही संस्था विशेष महत्त्वाच्या आहेत. स्त्री पुरूषाला विवाह करण्याचा आणि वैवाहिक जीवन जगण्याचा अधिकार सर्व समाजात मान्य केला गेला आहे. एवढेच नसून प्रत्येकाने विवाह करणे हे सामाजिक कर्तव्य आहे असे समजण्यात येते. असे असूनही समाजात कुणी-कुणासोबत विवाह करावा अथवा करू नये यासंबंधीचे नियम आजही समाजात अस्तित्वा असल्याचे दिसून येते. कारण विवाह हा केवळ दोन व्यक्ती पुरताच मर्यादित नसून त्यासंबंधी सामाजिक संदर्भ महत्त्वाचा ठरतो.

**उद्दिष्ट्ये (Objectives):**

1. जोडीदार निवडीचे निकष माहीत करून घेणे.

**तथ्य संकलन (Fact Collections):**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधन सामग्रीचा उपयोग केला गेला आहे. यासाठी संकेतस्थळ, संदर्भग्रंथ, विविध मासिके व नियतकालिके तसेच वर्तमानपत्र इत्यादींचा संदर्भ घेण्यात आलेला आहे.

**संशोधन पद्धत (Research Methodology):**

स्त्री-पुरूषांना त्यांच्या आवडीचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य दिले असले तरी त्यांनी

सामाजिक नियमांचे पालन करणे आवश्यक असते. अन्यथा समाजाकडून त्यांना द्वेष स्वीकारावा लागतो. आधुनिक काळात जोडीदार निवडीबाबत थोडी शिथीलता आली असेल तरी याबाबत पालकांचा अधिकार व निर्णय अंतिम असतो. स्त्री-पुरूषांना केवळ त्यांच्या पसंती पुरतेच स्वातंत्र्य असते. आधुनिक काळात समाजात जोडीदार निवडीसाठी विवाह मंडळाचा आधार घेतला जात आहे व ही विवाह मंडळे त्यांच्याकडे नोंदवलेल्या वधु-वरांना योग्य जोडीदार मिळवून देण्यासाठी वर्तमान पत्रातून जाहिराती देतात.

संपूर्ण आयुष्यासाठी जोडीदार निवडत असताना अधिक सावध असणे महत्त्वाचे ठरते. जीवनात योग्य जोडीदार मिळाला तर संपूर्ण जीवन सुखमय होते. याबाबतीत काही चूक झाली तर भविष्यात त्याचा दुष्परिणमांना सामोरे जावे लागते. त्यामुळे जोडीदाराची निवड करणे हा अतिशय संवेदनशील विषय आहे. विवाहानंतर ज्या व्यक्तीसोबत संपूर्ण आयुष्य एकत्र राहायचे आहे त्याच्यासोबत योग्य संबंध असायला हवे. दोघेही समजूतदार असतील तर भविष्यातील वाद टळू शकतात व आनंदाने एकत्र राहता येते. जोडीदार निवडत असताना अनेक बाबींचा विचार केला जातो. जसे जोडीदाराचे सौंदर्य, वय, शिक्षण, जात, धर्म, जोडीदारांची सामाजिक व आर्थिक स्थिती, दोघांमधील योग्य संवाद, त्याचबरोबर कुल, शील, शरीर, सामर्थ्य, कीर्ति, धन इत्यादी गुणांचा देखील जोडीदार निवडीसाठी अंतर्भाव होतो.

**(1) वय :** अगदी लहान वयात विवाह झाला तर वयानुसार शारीरिक, बौद्धीक, भावनिक व सामाजिक परिपक्वता आलेली नसते. विवाहानंतरच्या जबाबदाऱ्या पेलण्यासाठी पुरेशी परिपक्वता त्यांच्यात नसते त्यामुळे विवाहानंतर त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. कमी वय असल्यामुळे जन्माला येणारी संतती निरोगी असलेच असे नाही त्यामुळे कायद्यानुसार विवाहासाठी मुलींचे वय 18 तर मुलांचे वय 21 वर्ष पूर्ण असायला हवे असे निश्चित झाले आहे.

**(2) सौंदर्य :** जोडीदार निवडत असताना जोडीदारीच्या बाह्य सौंदर्याला देखील महत्त्व दिले जाते. प्रत्येकाला आपला जोडीदार हा आपल्या अनुरूप असावा वाटतो तर कधी सौंदर्यासोबतच त्याचा स्वभाव व त्याच्या कर्तृत्वाला देखील प्राधान्य दिले जाते. विवाहापूर्वी जोडीदाराच्या सौंदर्यविषयक कल्पना स्पष्ट नसतील तर कुटुंबातील व्यक्तींनी ठरवून दिलेल्या मुलांशी अथवा मुलींशी विवाह करावा लागतो.

**(3) शिक्षण :** जोडीदार निवडत असताना जोडीदाराचे शिक्षण हा घटकदेखील महत्त्वाचा ठरतो. प्रत्येकाला आपला जोडीदार आपल्यापेक्षा उच्च शिक्षीत असावा वाटतो. याबाबतीत प्रत्येकाच्या अपेक्षेनुसार उच्च शिक्षतीच जोडीदार मिळेलच असे सांगता येत नाही. तर कधी-कधी यासाठी आंतरजातीय विवाहदेखील केला जातो. तर काहीवेळा शिक्षणाला महत्त्व न देता जोडीदाराचे कुटुंब, त्याची सामाजिक व आर्थिक परिस्थिती, कार्यक्षेत्र हे देखील पाहिले जाते. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये जुळवून घेण्याची क्षमता, जबाबदारीची जाणीव आणि इतर परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता व योग्य निर्णय घेण्याची क्षमता येते. त्यामुळे जोडीदार निवडताना जोडीदाराच्या शिक्षणाला अधिक महत्त्व दिले जाते.

**(4) जात :** जोडीदार निवडीच्या निकषामध्ये जात हा घटक आजही पूर्वी एवढाच महत्त्वाचा ठरतो. व्यक्ती ज्या समाजात राहतो त्यावरून त्याची ओळख होत असते. फार पूर्वीपासूनच प्रत्येकाने त्यांच्या पोटजातीतच विवाह करावा असे बंधन होते. आधुनिक काळात जरी याबाबतीत काही शिथीलता दिसून येत असली तरी प्रत्येकाचा कल कळत नकळत समाजाचे नियम पाळण्याकडे असतो म्हणून आजही

एकाच जातीतील व धर्मातील जोडीदारास प्राधान्य दिल्याचे दिसते.

**(5) सामाजिक व आर्थिक स्थिती :** जोडीदार निवडत असताना जोडीदाराच्या कुटुंबाची सामाजिक व आर्थिक स्थिती पाहिली जाते. प्रत्येक पालकाला त्यांच्या मुलींचया भविष्याची चिंता असते. तसेच युवतींना देखील त्या ज्या वातावरणात राहत आहेत त्या प्रकारचेच जोडीदाराचे सामाजिक व आर्थिक वातावरण असावे वाटते. त्यामुळे जोडीदार निवडत असताना जोडीदाराच्या सामाजिक व आर्थिकस्थितीला महत्त्व दिले जाते.

**(6) दोघांमधील योग्य संवाद :** जोडीदाराची मानसिकता समजून घ्यायची असेल तर दोघांमध्ये मनमोकळा संवाद होणे महत्त्वचे आहे. पण सर्वच कुटुंबातून यासाठी भेटण्याची संम्मती दिली जातेच असे सांगता येत नाही. त्यामुळे मोबाईलसारख्या इलेक्ट्रॉनीक माध्यमांचा वापर केला जातो. तर काही कुटुंबातून एकमेकांचे विचार जाणून घेण्यासाठी मुला-मुलींना भेटण्याची संधी दिली जाते. मुला-मुलींनी नातेसंबंधाविषयी व समस्यांबद्दल एकमेकांशी बोलणे आवश्यक आहे. यातूनच एकमेकांची विचार अनुरूप आहेत अथवा नाही तसेच वर्तन आणि वैचारिक क्षमता देखील कळू शकते.

**निष्कर्ष (Conclusion):**

जोडीदार निवडत असताना व्यक्तीवर वेगवेगळ्या निकषांचा प्रभाव असतो. प्रत्येकाचा वेगवेगळ्या कल्पना असतात, प्रत्येकाची वैचारिक पातळी भिन्न असते. काही व्यक्ती जोडीदार निवडीचे निकष म्हणून शारीरिक आकर्षण चेहऱ्याचे स्वरूप, शारीरिक बांधा, वय या बाबींना महत्त्व देतात तर काही व्यक्ती जोडीदाराची चांगली नोकरी, उच्च शिक्षण, कुटुंबाची सामाजिक व आर्थिकस्थिती इत्यादीला महत्त्व देतात.

**संदर्भग्रंथ (References):**

1. आगलावे, डॉ. प्रदीप, 'आधुनिक भारतातील सामाजिक समस्या', नागपूर : विद्या प्रकाशन
2. कुलकर्णी, प्रा. पी. के. आणि गंदेवार, प्रा. एस. एन., 'सामाजिक संस्था', लातूर : विद्याभारती प्रकाशन
3. कुलकर्णी, प्रा. पी. के. आणि गंदेवार, प्रा. एस. एन., 'सामाजिक संस्था आणि सामाजिक गट', लातूर : विद्याभारती प्रकाशन
4. maharashtratimes.com
5. https://www/kalnirnay.com
6. फरकाडे, प्रा. त्रिवेणी आणि गोंगे, सौ. सुलभा 'विवाह आणि कौटुंबिक संबंध', नागपूर: विद्या प्रकाशन